सोलापूर महानगरपालिका

प्रेस नोट :-

सोलापूर दि.16/01/201 :- सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशा नुसार मतदार जनजागृती अभियान सोलापूर महानगरपालिका व सोलापूर विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राद्यापक यांच्या समवेत नॉर्थकोट प्रशाला येथे बैठक आयोजित करण्यात आली होती .

या जनजागृतीमध्ये मतदान करण्या संदर्भात नागरिकामध्ये जनजागृती करण्यासाठी आपण सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने पथनाटय, चित्ररथ, चित्रकला स्पर्धा , रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या रॅली या माध्यमातून नागरीकामध्ये मतदानाचा टक्केवारी वाढण्यासाठी हे अभियान यशस्वीपणे राबविण्याचे प्रयत्न करावा. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पारितोषक व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे असे या प्रसंगी आयुक्त वि.ना.काळम यांनी सांगितले.

उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ या प्रसंगी म्हणाले की उत्तर सोलापूर तहसिलदारांच्या माध्यमातूनही हे सर्व स्पर्धे राबवून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार असल्याचे व या स्पर्धेमध्ये ज्या महाविद्यालयांनी सहभाग नोंदविलेला नाही त्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून पारितोषक मिळवावेत.

नागरिकामध्ये मतदार जनजागृती करण्यासाठी सोलापूर विद्यापीठा अंतर्गत सर्व महाविदलयातील विद्यार्थ्यांनी सोलापूर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकमध्ये टक्केवारी वाढवणे बाबत गृहनिर्माण सोसायटीमध्ये मतदार जनजागृत अभियान सोशल मिडियाचा वापर करणे,बेस्ट सेल्फी आवार्ड स्पर्धा, व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करणे, पथनाट्य व रांगोळी, चित्रकला,पोस्टर या स्पर्धांच्या माध्यमातून मतदार जनजागृतीचा काम चालू आहे. तसेच 25 जानेवारी 2017 रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयांनी एक चित्ररथ वाहनाव्दारे सादरीकरणे करण्यात यावे. हे चित्ररथाची सुरुवात चार हुतात्मा पासून रंगभवन येथे समारोप होईल. या स्पर्धेलाही पारितोषक देण्यात येणार आहे.असे डॉ.नरेंद्र काटीकर यांनी व्यक्त केले.

तसेच उपायुक्त श्रीकाम मायकलवार यांनी या वेळी मार्गदर्शन केले.

उच्च शिक्षण सहसंचालक सतीश देशपांडे सर, रविंद्र चिंचोळकर सर, डॉ. पी पी सावंत सर, प्र.शि.मं.प्रशासनाधिकारी,सुधा साळुंखे, यांनी मतदार जनजागृती विषयावर मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, उपायुक्त तथा उपनिवडूक निर्णय अधिकारी,सहाय्यक आयुक्त प्रदिप साठे,अभिजीत हराळे, आदीसह विविध महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक व विभागीय अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदापक,

दैनिक,--------------------

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विंनती आहे.

जनसंपर्क अधिकारी

सोलापूर महानगरपालिका